सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/७८१ अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे दिनांक : १८/१०/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

विषय : स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना सहभागी विद्यार्थी माहिती पाठविणेबाबत....

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. १६ ऑक्टोबर, २०२३
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. २८ नोव्हेंबर, २०२३
३. उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे उशिसं/विवि/२०२३/मवि–१/१६२४३, दि. ०६ डिसेंबर, २०२३
४. या विभागाचे विविमं/२०२३–२४/४००, दि. २९/१२/२०२३ चे पत्र.
५. या विभागाचे विविमं/२०२३–२४/३३४, दि. २९/०४/२०२४ चे पत्र.
६. या विभागाचे विविमं/२०२४–२५/४६१, दि. २३/०७/२०२४ चे पत्र.
७. मा. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे उशिसं/विवि/२०२४/मवि–०१/E-Comp. No. ८७९८४८ दि. १७ ऑक्टोबर, २०२४ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांसाठी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजना लागू करण्यात आली आहे. सदर 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील विविध माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देऊन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करून नोंदणी करण्याबाबत आपणास यापूर्वीच कळविण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ७ अन्वये शासनाने सदर योजनेच्या अनुषंगाने;

१. संलग्नित महाविद्यालयांतील किती विद्यार्थ्यांनी विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा व विद्यार्थी वैद्यकीय विमा साठी नोंदणी केलेली आहे. याबाबतचा तपशिल मागविला आहे.

२. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध नसल्यास, तात्काळ सदरहू योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील किती विद्यार्थ्यांनी विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा व विद्यार्थी वैद्यकीय विमा साठी नोंदणी केलेली आहे व योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध आहे किंवा नाही याची माहिती खालील गुगल लिंकवर दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरण्यात यावी.

https://forms.gle/Mv9M5ZgGvkH39qKZA

सदर माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने खात्रीपूर्वक व जबाबदारीने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार) विद्यार्थी विकास मंडळ

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्रमांक-उशिसं/विवि/२०२४/मवि- ०१/ E-Comp. No.: 879848

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

विषय- राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करणेबाबत.

संदर्भ- १.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.१६.१०.२०२३
२.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.२८.११.२०२३
३.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/विवि/२०२३/मवि- ०१/१६२४३ दि. ०६.१२.२०२३

उपरोक्त विषयी, संदर्भांकीत शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ' स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility , Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये दिलेल्या आहेत. तसेच याबाबतचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. संचालनालयाचे संदर्भीय पत्र दि. ०६.१२.२०२३ अन्वये आपल्या कार्यक्षेतील विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.

सदर योजनेबाबत विद्यापीठांकडून पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी या योजनेबाबत केलेल्या कार्यवाहीचा पत्रव्यवहार सादर करावा.
२. सदर योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील किती विद्यार्थ्यांनी ' विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा ' व ' विद्यार्थी वैद्यकीय विमा ' साठी नोंदणी केलेली आहे, याबाबतचा तपशिल सादर करावा.
३. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा. संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला नसल्यास, तात्काळ सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

Scanned with OKEN Scanner

४. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

५. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उक्त निर्देशानुसार स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. २५.१०.२०२४ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-10-2024 18:14:13

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

Scanned with OKEN Scanner